## फौजदारी किरकोळ अर्ज क्र. १३६/२०२२ मधील निशाणी १ खालील आदेश

(प्रथमेश दिनकर जाधव वि. ग्रामसेवक, ग्रामपंचायत चिंचोली, ता.शिराळा)

**CNR MHSN14000896-2022**

प्रस्तुतचा अर्ज हा अर्जदार यांनी जन्म मृत्यू नोंदणी कायदा, १९६९ चे कलम १३(३) अन्वये दाखल केलेला आहे. अर्जदाराचे संक्षिप्त अभिकथन असे की, अर्जदार यांचे चुलते कै. श्रीरंग शामराव जाधव हे अविवाहीत असताना चिंचोली, ता.शिराळा, जि.सांगली दिनांक १४/०१/२००३ रोजी मयत झालेले आहेत. अर्जदाराच्या चुलत्यांच्या मृत्यूची नोंद चिंचोली ग्रामपंचायतीच्या रेकॉर्ड सदरी करण्याचे राहून गेलेले आहे. अर्जदार यांना त्यांच्या शेती व घर मिळकतीस वारस नोंद करणेकामी कै. श्रीरंग शामराव जाधव यांचे मृत्यू दाखल्याची आवश्यकता असल्याने त्यांनी जाबदार यांचेकडे मृत्यू दाखल्याची मागणी केली असता, त्यांनी दिनांक ०४/१०/२०२२ रोजीच्या अनुउपलब्धता प्रमाणपत्राअन्वये मृत्यूची नोंद त्यांचे रजिस्टरला आढळून येत नसल्याबाबत दाखला दिलेला आहे. अर्जदार यांनी विनंती केली की, त्यांच्या चुलत्यांचा मृत्यू दिनांक १४/०१/२००३ अशी नोंदण्यात यावी व मृत्यूचा दाखला अर्जदार यांना देणेत यावा असा जाबदार यांना आदेश करण्यात यावा.

२. जन्म मृत्यु नोंदणी कायदा कलम १३(३) च्या तरतुदीप्रमाणे मृत्यूची नोंद संबंधित नोंदवहीमध्ये नोंदविण्याकरीता समक्ष प्राधिकारी यांना आदेश देण्याचा या न्यायालयास अधिकारीता आहे. अर्जदारतर्फे निशाणी क्रमांक ३ अन्वये जाबदार यांचेकडील अर्जदार यांच्या चुलत्याचे मृत्यू नोंद नसल्याबाबतचा त्यांचेकडील दिनांक ०४/१०/२०२२ रोजीच्या अनुउपलब्धता प्रमाणपत्राची मुळ प्रत नि.क्र. १० वर दाखल केली आहे. नि.क्र. १५ वर अर्जदार यांचे आधारकार्डची पडताळणी केलेली प्रत दाखल केलेली आहे. याशिवाय नि.क्र. ८ सोबत दैनिक जनप्रवास मधील दि. २४/११/२०२२ रोजीची जाहीर नोटीस नि.क्र. ११ वर दाखल केली आहे. प्रस्तुत अर्जाचे कामी अर्जदारतर्फे स्वत:चे पुराव्याचे शपथपत्र नि.क्र. ९ वर व साक्षीदार महादेव मारुती जाधव यांचे पुराव्याचे शपथपत्र नि.क्र. १२ वर दाखल केलेले आहे. अर्जदारतर्फे पुरावा बंद पुरसीस नि.क्र. १६ वर दाखल करण्यात आली. सदरकामी जाबदार यांनी हजर होवून त्यांचे म्हणणे दिले नसल्यामुळे जाबदार विरुध्द सदरचा अर्ज एकतर्फा चालविण्याचा आदेश पारीत करण्यात आलेला आहे.

**३.** अर्जदार व साक्षीदार यांच्या सरतपासाच्या शपथपत्रांवरुन असे दिसून येते की, अर्जदार यांचे चुलत्याचा मृत्यू दिनांक १४/०१/२००३ रोजी झालेला आहे. याकामी दाखल केलेल्या शपथपत्रातील कथने नाकारण्यासाठी कोणतेही संयुक्तिक कारण नाही. त्यामुळे मौखिक व कागदोपत्री पुराव्यावरुन अर्जदार यांचे चुलते कै. श्रीरंग शामराव जाधव यांचा मृत्यू दिनांक १४/०१/२००३ रोजी मौजे चिंचोली येथे झाला असल्याबाबत माझे समाधान झालेले आहे. सबब प्रस्तुत अर्ज मंजुर करणे मला रास्त वाटते. परिणामी मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. श्रीरंग शामराव जाधव यांची मृत्यू तारीख दिनांक १४/०१/२००३ अशी संबंधीत रजिस्टरला नोंद आवश्यक ते विहीत शुल्क भरल्यानंतर घेण्यात यावी असे जाबदार यांना आदेशित करण्यात येत आहे.

३. अर्जदार यांनी विहीत फी भरल्यानंतर त्यांना श्रीरंग शामराव जाधव यांच्या मृत्यू दाखल्याची प्रत देण्यात यावी.

PRITI ASHOK SHRIRAM
Digitally signed by PRITI ASHOK SHRIRAM
Date: 2023.01.09 17:00:07 +05'30'

शिराळा **(प्रीती अ. श्रीराम)**

दिनांक ०९/०१/२०२३ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, शिराळा.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | V. S. Patil |
| Court | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Shirala |
| Date | : | 09/01/2023 |
| Order signed by the Presiding Officer on | : | 09/01/2023 |
| Order uploaded on | : | 10/11/2022 |